## "महात्मा ज्योतिराव फुले सार्वजनिक सत्यधर्म व महिला सबलीकरण "

**प्रा. सौ. छाया भारत सकटे**, शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद. sakatecb@gmail.com, 9764864886

---

**गोषवारा :-** महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाज ही समाज प्रबोधन संस्था स्थापन करून 150 वर्ष पूर्ण झाली. त्या निमित्ताने सत्यशोधक समाज व त्याच्या माध्यमातून महात्मा ज्योतिराव फुले यांनी केलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांची उकल व ते सोडवण्यासाठी केलेल्या कार्याचा आढावा या शोधनिबंधात घेतला आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या समाज प्रबोधनामुळे विद्येचे पुनर्जीवन झाले. आधुनिक शास्त्राचा उदय झाला. निधर्मी कल्पनांना प्राधान्य मिळाले. जिज्ञासा वाढीस लागली आणि स्त्री प्रगतीचा मार्ग मोकळा झाला .महात्मा फुल्यांनी आयुष्यभर हिंदू धर्मातील अनेक सिद्धांतांवर कठोर हल्ला चढविला. त्या धर्मातील शोषण करणारा बहुतांश भाग नाकारला. याबाबतीतील फुलांचे विचार ज्यांना पटले जे लोक त्यांचे विचार मानू लागले अशा लोकांना बरोबर घेऊन त्यांनी सत्यशोधक समाज या संस्थेची स्थापना केली. ते स्वतःला हवे असलेले समाज परिवर्तन समाजाच्या मार्फत घडवून आणत होते. सत्यशोधक समाजाचे तत्वे पाहिल्यास समाजात "समानता" प्रस्थापित करण्यासाठी लागणारी मांडणी महात्मा फुले यांनी केली आहे. सत्यशोधक समाजाची तीन प्रमुख तत्वे आहेत.

1. ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निराकार, निर्गुण व सत्तेरूप आहे. व सर्व मनुष्य प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.
2. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे.
3. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.

वरील सत्यशोधक समाजाचे तत्वे पाहिलास असे लक्षात येते की, महात्मा फुलांनी या तत्त्वाच्या माध्यमातून समाजातील विषमता नाकारली धर्मातील विडंबन नाकारून ईश्वर एक आहे असा विचार मांडला.

**संकेत शब्द :–** वैदिक धर्म, समाज प्रबोधन, विद्येचे पुनरुज्जीवन, निधर्मी, समानता, निर्मिक, सत्यधर्म, परंपरा ,महिला सबलीकरण, स्त्री उद्धार, स्त्री शिक्षण, धर्मसिद्धांत, सहसंबंध, सामाजिक स्थित्यंतर, मानवी स्वातंत्र्य, स्त्रीवाद.

**प्रस्तावना :-** आपल्या सार्वजनिक सत्यधर्मामुळे एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांचे कल्याण व्हावे असे महात्मा फुले पुन्हा पुन्हा म्हणत असत. परंपरागत धर्मातही ऋषी, मुनी, संत अशा प्रकारेची इच्छा व्यक्त करतात. मग फुलांचा सत्यधर्म कशाला असा प्रश्न समाजातील धार्मिक वृत्तीच्या व्यक्ती उभा करतात .वरवर पाहता हा प्रश्न मार्मिक वाटतो. परंतु बारकाईने पाहिले असता परंपरागत धर्म आणि फुलांचा सत्यधर्म यामध्ये फार मोठी तफावत आहे . परंपरागत धर्मामध्ये एकीकडे सर्वांना सुख प्राप्त व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली , तर दुसरीकडे थोड्या लोकांच्या सुखासाठी इतर अनेक लोकांचे शोषण करण्याचे धर्मसिद्धांत मांडले गेले. भारतीय समाजातील स्त्रियांना अनेक वाईट प्रथामध्ये बांधले गेले. या धर्मसिद्धांतामुळे भारतीय समाजातील महिलांना मनुष्य म्हणूनही नाकारले. धर्म श्लोकांमध्ये व प्रत्यक्ष व्यवहारात खूप फरक आहे हे समाजातील वास्तव मांडण्याचे काम महात्मा फुलेंनी केले.

सार्वजनिक सत्यधर्म या शब्दसमूहात धर्माला लावलेली 'सार्वजनिक' व 'सत्य' ही दोन्ही विशेषणे महत्त्वाचे आहेत. त्यांना धर्म मोजक्या लोकांपुरता मर्यादित नको होता. तो सर्व लोकांना उपलब्ध असावा असे फुलांना वाटत होते .तो वैदिक धर्माप्रमाणे विषमता शोषण कृत्रिमता या मूल्यांवर आधारलेला नाही. तो सत्य रुपी आहे.

महात्मा ज्योतिराव फुले धर्माधर्मांमध्ये माणसांची झालेली विभागणी व त्याचे दुष्परिणाम याची जाणीव तीव्रतेने करून देतात. माणसातील फूट व भेद अमान्य करतात .भारतीय समाज रचनेचा व इतिहासाचा स्वतंत्र अन्वयार्थ महात्मा ज्योतिराव फुले यांनी लावला आहे. समाज म्हणजे केवळ व्यक्ती समूह नव्हे. समाजातही अनेक बदल घडून येत असतात. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजात समाजाचा जबाबदार घटक म्हणून राहिल्याशिवाय व्यक्तीचा खरा विकास होऊ शकत नाही. या विचाराचा धागा पुढे नेत महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या विचाराची मांडणी केली आहे. ही मांडणी स्त्री-उद्धाराची व महिला सबलीकरणाची आहे.

**उद्देश** :- 1. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा समाज प्रबोधन विचार म्हणून अभ्यास करणे.
2. महात्मा ज्योतिबा फुले व महिला सबलीकरण याचा अभ्यास करणे.
3. सार्वजनिक सत्यधर्म व महिला सबलीकरण यांचा सहसंबंध अभ्यासणे.

**गृहीतके:-** 1. महात्मा फुले यांचे विचार हे समाज प्रबोधनाचे विचार आहेत.
2. महात्मा फुले यांच्या विचाराने व कार्याने महिला सबलीकरण झाले आहे.
3. सार्वजनिक सत्यधर्म व महिला सबलीकरण यांचा सहसंबंध आहे.

**महात्मा फुले व समाज प्रबोधन** :- महात्मा ज्योतिराव फुले कालीन राष्ट्रीय पुढारी राजकारणाला जेवढे महत्त्व देत होते. तेवढे महत्त्व समाजकारणाला देत नव्हते. सर्वसामान्य मनुष्यावर जेवढा प्रभाव राजकीय पुढाऱ्यांचा पडला होता. तेवढा समाज सुधारकांचा पडला नाही. महात्मा फुले यांच्या काळात समाज सुधारकांना व त्याकरता कराव्या लागणाऱ्या सामाजिक प्रबोधनाला दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले होते. धर्माचा संबंध हा सामाजिक स्थित्यंतराशी अतिशय निकटच असतो. सामाजिक

सुधारणा म्हणजे परंपरागत धर्म संकल्पनांना बाजूला करण्याचा नवीन प्रयत्न असतो. व त्याद्वारे नवीन मूल्य प्रस्थापित केले जातात. भारतीय समाज व्यवस्थेत नवीन मूल्ये रुजविताना महात्मा फुले यांनी स्त्री ,कामगार, शूद्र अधिक शूद्र वर्गाचा समान पातळीवर विचार केलेला दिसतो. समाजातील मानसिक दास्य दूर करून नवीन विचार स्वीकारला पाहिजे असे समाज प्रबोधन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाज प्रबोधनाचे काही पैलू खालील प्रमाणे मांडता येतील.

**मानवी स्वातंत्र्य-** महात्मा ज्योतिबा फुले यांनी हिंदू समाजातील बुद्धिभेदाचा कहर कसा होता, हे सांगून तो दूर कसा करता येईल याविषयी मांडणी केली. मनुष्याला स्वतंत्रता असणे ही जरुरीची गोष्ट आहे, व ज्यांना ती नाही ती मिळवून देण्यास झटणे हे प्रत्येक समाजाचे कर्तव्य आहे, या भावनेने महात्मा ज्योतिराव फुले स्त्रिया व शुद्रांसाठी झटले आहेत. मनुष्य हा जन्मतः स्वतंत्र आहे. ईश्वर एक आहे. अशी मांडणी करत समाजातील विषमता मानवनिर्मित आहे .हे समाज मनावर रुजवण्याचे काम महात्मा फुल्यांनी केले आहे. महात्मा फुले यांच्या सर्व विचारांच्या मुळाशी मानवाचे स्वातंत्र्य ,मानवाची मुक्ती मानवाची समानता हे महत्त्वाची मानवी मूल्य असल्याचे दिसते. त्यांच्या समाजप्रबोधनाचा गाभा हा मानवी स्वातंत्र्य होता. भारतीय समाजातील स्त्रियांचे नाकारलेले स्वातंत्र्य त्यांना पुन्हा मिळवून देणे, माणूस म्हणून त्यांना समाजात सन्मान मिळवून देणे, हे फुलांच्या समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट होते.

**साहित्य-** महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाज प्रबोधनासाठी साहित्याचा वापर केला आहे. अनुभवातून स्फुरलेले विचार त्यांनी बोली भाषेत, लोकांच्या भाषेत लोकांपर्यंत पोहोचविले आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ भक्कम पायावर उभे केले आहे. आपल्या साहित्य निर्मितीतून तात्कालीन समाजव्यवस्था, संस्था अंधश्रद्धा याविरुद्ध बंड उभे केले आहे. 'तृतीय रत्न' या छोट्या वडमय कृतीपासून प्रारंभ करून गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड, सार्वजनिक सत्य धर्म असे अनेक ग्रंथ निर्मिती समाज प्रबोधनासाठी त्यांनी केली आहे.

**शिक्षण-** विद्या विना मती गेली ,मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली, गती विना वित्त गेले
वित्तविना शुद्र खजले ,इतके अनर्थ एका अविद्येने केले.

समाज प्रबोधनासाठी शिक्षणाचा वापर अतिशय मार्मिक पद्धतीने महात्मा फुलेंनी केलेला दिसतो. शिक्षणाचे सार्वत्रिकरण केले पाहिजे असा त्यांचा विचार होता. शिक्षणाचे सार्वत्रिकरण म्हणजे जात, धर्म, पंथ, लिंग व शारीरिक अपंगता याचा अडसर न ठेवता समाजातील सर्व घटकांना समानतेच्या तत्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे होय. 1882 च्या हंटर शिक्षण आयोगा पुढील त्यांची साक्ष इंग्रज शासनकर्त्यांची कान उघडणे करणारी व शिक्षण विषयक द्वेष्टेपणाही स्पष्ट करणारी आहे. स्त्री शिक्षणाचा आग्रह व त्यासाठी उचललेले पाऊल हे त्यांच्या शिक्षण विषयक विचाराची व्यापकता स्पष्ट करणारी आहे. भारतीय समाजातील स्त्रियांची मानसिक गुलामगिरी बदलण्यासाठी शिक्षण हा प्रभावी उपाय महात्मा फुलेंनी सुचवला व त्यासाठी मुलींच्या शाळा स्थापन करून मुलींच्या शिक्षणाचा प्रारंभ भारतीय समाजात त्यांनी केला.

**सार्वजनिक सत्यधर्म व महिला सबलीकरण यांचा सहसंबंध :-** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कालखंडात सामाजिक प्रबोधनाचे दोन प्रवाह कार्यरत होते. एक प्रवाह होता लोकहितवादी, रानडे व आगरकर या विचारवंतांचा ,तर दुसरा प्रवाह होता महात्मा फुले, छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या. धर्माच्या द्वारे व धर्माच्या नावावर जेव्हा असंख्य रूढी, परंपरा थैमान घालू लागतात. तेव्हा अंधश्रद्धा निर्माण होऊन त्याला धर्माचा आधार देण्याचा प्रयत्न केला जातो आणि तेव्हाच, समाजात अधर्म निर्माण होतो. सामाजिक सुधारणा या व्यापक अर्थाने धार्मिक सुधारणाच असतात. त्या करण्यासाठी त्यांनी 24 सप्टेंबर 1873 ला सत्यशोधक समाज स्थापन केला. सत्यशोधक समाजा द्वारे त्यांनी धर्मातील सत्य व सार्वजनिक जीवनातील सत्य प्रकाशात आणला. जातीजातींमध्ये श्रेष्ठ कनिष्ठता नाहीशी करून विशुद्ध पायावर समाज रचना घडवून आणण्याचा तो एक प्रामाणिक प्रयत्न होता. हा प्रयत्न स्त्री-उद्धाराच्या कार्याची सुरुवात होते असे म्हटले तर अतिशय ठरणार नाही. कारण धर्म व जाती व्यवस्थेचा सगळ्यात वाईट व दीर्घकाळ परिणाम भारतीय समाजातील स्त्री वर झाला आहे. धर्म व जात व्यवस्थेतील सत्य समाजाच्या समोर मांडण्याचे काम महात्मा फुले करतात .त्यामुळे स्त्री वरील बंधने चुकीची आहेत हा विचार समाजासमोर मांडला गेला .सुरुवातीला या विचाराला विरोध झाला. परंतु नंतर तो समाजाने मान्य केलेला दिसतो. सत्यशोधक समाजासाठी महात्मा फुल्यांनी स्वीकारलेल्या तत्त्वाने भारतीय समाज व्यवस्थेतील विषमता नाकारली. समाजात समानता हा विचार मांडला. समाजातील ही समानता म्हणजे स्त्रीला स्त्री दाशातून मुक्त करणारी ,तिला माणूस म्हणून मान्यता देणारी आहे. ब्राह्मण पुरोहितांना धर्मा पासून बाजूला ठेवून विवाह लावण्याची पद्धत सत्यशोधक समाजाने रूड केली. लग्नातील अनावश्यक खर्च, रुढीपरंपराच्या नावावर चाललेला बाजार, हुंडा पद्धती या विवाह पद्धतीने बंद करता आले असते. परंतु ही विवाह पद्धत समाजात रूढ होऊ शकली नाही. उलट नव्याने खर्चिक गोष्टी विवाह पद्धतीला जोडल्या जात आहेत. उदाहरणार्थ प्री वेडिंग शूट.

भारतीय समाजातील स्त्रीला दास्यातून मुक्त करण्यासाठी स्त्री शिक्षण, पुनर्विवाह हे विचार प्रकर्षाने मांडले जाऊ लागले. यात महत्त्वाची भूमिका महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांची होती. भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरुवात ज्योतिबांनी केली. स्त्री- पुरुष समानतेचा विचार त्यांनी मांडला. सर्व प्रकारच्या सामाजिक विषमतेवर प्रहार करताना त्यांनी स्त्री-पुरुष

विषमतेला ही अग्रक्रमाने वाचा फोडली. स्त्री-पुरुष समानता हा वैचारिक बदलाचा, मानसिकतेच्या बदलाचा प्रश्न आहे. आणि तो शिक्षणानेच सुटू शकेल, असा त्यांना विश्वास वाटत होता. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून त्यांनी स्त्री शिक्षणाला सुरुवात केली. स्त्रियांना सर्वाधिक बंधनात ठेवणारा, मानसिक गुलामगिरी लाधनारा घटक म्हणजे धर्म होय. या धर्मावरच महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या मार्फत प्रहार केलेला दिसतो. सत्यशोधक समाज धर्मातील जाचक व पुरोहित वर्गाचा हस्तक्षेप नाकारतो. म्हणजे एका अर्थाने महिला सबलीकरणाचा पुरस्कार करतो. कारण पुरोहित वर्ग धर्म व धर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा कायम राहाव्यात म्हणून प्रयत्न करत असतो. व त्याचा सरळ प्रभाव, परिणाम भारतीय समाजातील महिलांच्या दास्यावर, गुलामगिरी वर होतो. भारतीय समाजातील स्त्रियांची गुलामगिरीतून ,स्त्री दास्यातून मुक्तता करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी काही सामाजिक कार्य करून, प्रत्यक्ष कृती करून महिला सबलीकरणाची सुरुवात केलेली दिसते. विधवा स्त्रियांच्या केशवपणाची प्रथा बंद करण्यासाठी तळेगाव व दमढेरे ,ओतुर येथे नाव्हाचा एक दिवसीय संप घडवून आणला. ८ मार्च 1864 रोजी गोखलेंच्या बागेत विधवा पुनर्विवाह घडवून आणला. बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. प्राथमिक शिक्षण मोफत, सार्वजनिक व सक्तीचे केले जावे अशी मागणी करणारे फुले हे आशियाई खंडातील पहिले शिक्षण तज्ञ होते.

**निष्कर्ष :-** स्त्रियांच्या संदर्भातील सामाजिक, आर्थिक, राजकीय समान हक्काची मागणी करणारी चळवळ आणि विचारसरणी म्हणजे स्त्रीवाद होय. यातील सर्व मूल्यांची आणि तत्वांची मांडणी महात्मा ज्योतिबा फुले यांनी केली आहे.

1.फुलेंनी सार्वजनिक सत्य धर्माची भूमिका स्पष्ट करताना लोकशाहीवादी ,मानवतावादी दृष्टिकोनातून केली आहे. सार्वजनिक चिकित्स्याचे, टीकेचे ,नवीन भर घालण्याचे ,कालसापेक्ष बदलाचे, लोकशाही प्रणालीप्रमाणे चर्चा संवाद, मतप्रदर्शनातून विकसित होण्याचे स्वातंत्र्य महात्मा ज्योतिबा फुले सर्वांना देतात व खऱ्या अर्थाने समाज प्रबोधनाचे कार्य करतात.

2.महात्मा ज्योतिबा फुले यांनी धर्मविषयक मांडणी करताना व्यक्ती स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य ,विवेक, सहजीवन व सह अनुभव यांना महत्त्व दिले आहे .हे महत्त्व महिला सबलीकरणाला व भारतीय समाजातील महिलांना समानता प्रधान करणारा व सन्मान देणारा ठरला आहे.

3.सार्वजनिक सत्यधर्माच्या व्यासपीठावरून केलेली मांडणी धर्मग्रंथ व धार्मिक व्यवहार यातील फारकत उघड करणारी आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी ही मांडून करून महिला सबलीकरणाला एक भक्कम आधार दिलेला आहे. धर्मातील अनिष्ट रूढी,प्रथा, परंपरा बंद झाल्या तर महिला सबलीकरणातील फार मोठा टप्पा पार होईल ,असे या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

4.हिंदू धर्माने चातुर्ण्याच्या चौकटीत जोपासलेली पारंपरिक मूल्य त्याज मानून, अपेक्षित समाज परिवर्तनाकरता, समाजाला सिद्ध करण्यासाठी लागणारे क्रांतिकारक तत्त्वज्ञान महात्मा फुले यांनी मांडले.

विचाराच्या जगात स्त्री-पुरुष असा भेद नसतो. हे दाखवण्याचे काम महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजासमोर मांडले. स्त्रीवाद म्हणजे समाजातील सर्व पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या दडपणुकीबद्दल जाणीव होणे, जाणीव करणे आणि त्याचबरोबर या दडपणुकी विरोधी उभे राहण्याची तयारी असणे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील दडपणुकीबद्दल स्त्रियांमध्ये जाणीव करून दिलीच, पण त्याबरोबर त्याच्या विरोधात उभे राहण्यासाठी शिक्षण, अर्थार्जन या मार्गाने दडपणुकी विरोधी उभी राहण्याची तयारीही भारतीय समाजात सुरू केली.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**


1. धनंजय कीर, महात्मा ज्योतिराव फुले ,पाप्यूलर प्रकाशन, मुंबई, 2015.
2. अ.रा.कुलकर्णी, महात्मा ज्योतिराव फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, डायमंड प्रकाशन, पुणे, जुलै, 2008.
3. आ.ह. साळुंखे, महात्मा फुले आणि धर्म ,लोकवांङ:मय गृह ,मुंबई ,2010.
4. अजित पाटील, खरा महात्मा ज्योतिबा, सायन पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, 2008.
5. संपादक अरुण शिंदे ,महात्मा फुले सार्वजनिक सत्यधर्म, दर्या प्रकाशन ,पुणे
6. भा. ल. भोळे, ज्योतीरावांची समता -संकल्पना, लोकमान्य गृह प्रकाशन, मुंबई, 1989.
7. संपादक य.दि. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, 1991.
8. पंढरीनाथ सिताराम पाटील ,महात्मा ज्योतिराव फुले, मनोविकास प्रकाशन, मुंबई, 1989.
9. रमेश पतंगे, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर- आजचे संदर्भ, हिंदुस्तान प्रकाशन सोसायटी, मुंबई.
10. डॉ. अशोक चौसाळकर, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ:मय गृह, मुंबई, 1990.
11. हरी रामचंद्र नरके, महात्मा फुलेंची बदनामी -एक सत्यशोधन, सुगावा प्रकाशन ,पुणे, 1989.
12. डॉ. गेल ऑम्व्हेट, ज्योतिबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार, लोकवाङमय गृह,
13. https:/mr.m.wikipedia.org.